**<u>दि.कि.अर्ज.नं.४६/२०१५ निशाणी क्र.२८ खालील आदेश</u>**

(विलास गोरक्षनाथ डोखे विरुध्द नामदेव नारायण मेहेत्रे)

अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज हा सामनेवाला नामदेव नारायण मेहेत्रे हे मयत झाल्याने त्यांचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी दाखल केला आहे. प्रस्तुतच्या अर्जासोबत वादीने शपथपत्र दाखल केले आहे.

२. अर्जदाराने प्रस्तुत अर्ज हा दिवाणी चौकशी अर्ज २७/२०११ हा पुन्हा फैलावर घेण्यासाठी दाखल केला असून, सदर चौकशी अर्ज रे.मु.नं.११७/२००६ चा दावा पुन्हा फैलावर घेण्यासाठी दाखल केला होता. तो अर्ज न्यायालयाने दि.२२/०४/२०१५ रोजी काढून टाकला. प्रस्तुत अर्जाचे कामकाज सुरू असताना, सामनेवाला नामदेव नारायण मेहेत्रे हे दि. ३०/०७/२०२४ रोजी मौजे केसापूर येथे मयत झाले. मयत सामनेवाला यांना अनिल नामदेव मेहेत्रे, सुनिता बाळासाहेब भागवत, सुनिल नामदेव मेहेत्रे असे वारस असून त्यांना अभिलेखावर घेणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक व गरजेचे आहे. सामनेवाला नामदेव नारायण मेहेत्रे हे प्रस्तुतचा अर्ज प्रलंबित असताना मयत झाले आहे. त्यामुळे सदरची वारसांची दुरूस्ती होणे आवश्यक व गरजेचे आहे. सदर दुरूस्ती मुळे मुळ अर्जाच्या स्वरूपात कोणताही बदल होणार नाही. म्हणून प्रस्तुतचा अर्ज मंजुर करावा अशी विनंती केली आहे.

३. सामनेवाला यांच्या वारसाने नि.३६ नुसार म्हणणे दाखल केले असून प्रस्तुतचा अर्ज हा कायद्याच्या तरतुदीला धरून नाही. सामनेवाला नामदेव नारायण मेहेत्रे हे दि. ३०/०७/२०२४ रोजी मयत झाल्याची बाब अर्जदार यांना माहित होती. अर्जदार व सामनेवाला हे एकाच गावातील रहिवासी आहेत. तरीदेखील जाणून बुजूण उशिराने अर्ज दाखल केला आहे. प्रकरण हे २०१५ पासून प्रलंबित असून केवळ न्यायालयीन प्रक्रियेचा दुरूपयोग करण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला असून, प्रस्तुतचा अर्ज हा नामंजूर व्हावा व सामनेवालाच्या वारसांना त्रास दिला म्हणून १०,०००/- कॉस्ट करण्याचा आदेश व्हावा. अशी विनंती केली आहे.

४. वादी व प्रतिवादी यांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील सर्व कागदपत्रांचे अवलोकन केले.

५. अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज हा दि.चौ.अर्ज २७/२०११हा पुन्हा फैलावर घेण्यासाठी व प्रस्तुत अर्जानुसार रे.मु.नं. ११७/२००६ चा दावा फैलावर घेण्यासाठी दाखल केला होता. सामनेवाला हे दि.३०/०७/२०२४ रोजी मौजे केसापूर ता. राहुरी येथे प्रस्तुतचा अर्ज प्रलंबित असताना मयत झाले असून अर्जदार यांनी सामनेवाला नामदेव नारायण मेहेत्रे यांचा मृत्यूदाखला नि.२३ नुसार दाखल केला आहे. सामनेवाला हे प्रस्तुतचा अर्ज प्रलंबित असताना मयत झाले आहे. सामनेवाले यांचे वारस अभिलेखावर घेण्याबाबत किती दिवसाचा विलंब झाला तसेच मयतास अर्जात नमुद केलेल्या वारसांव्यतिरीक्त इतर वारस आहेत. याबाबत सामनेवाला यांनी आक्षेप अथवा हरकत घेतलेली नाही. मुळ दावा रे.मु.नं.११७/२००६ या दाव्यामध्ये अर्जदाराचे हक्क व अधिकार असल्याचे मुळ अर्जावरून दिसून येते. प्रस्तुत अर्ज गुणावगुणावर चालने व नैसर्गिक तत्वानुसार अर्जदार यांना संधी देणे आवश्यक व गरजेचे आहे. अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज उशिरा दाखल करण्यामागे कोणतेही संयुक्तिक स्पष्टीकरण अथवा कारण अर्जात नमुद केलेले नाही. म्हणून प्रस्तुतचा अर्ज हा काही कॉस्ट देण्याच्या अटीवर मंजुर होणे उचित होईल म्हणून मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

**१.** अर्ज नि.२८ हा सामनेवाला यांना रक्कम रू. १,०००/– कॉस्ट देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

**२.** अर्जदार याने अर्जाची पूर्तता केल्यानंतर मुळ अर्जात दरूस्ती करावी.

PANKAJ HILAL PATIL Digitally signed by PANKAJ HILAL PATIL Date: 2026.01.21 10:19:18 +0530

राहुरी ( **श्री. पी. एच. पाटील** )

दि. २०.०१.२०२६ २ रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, राहुरी